# T12/AGR204/EE/20160304

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उपप्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

   अ) कृषि विद्याशास्त्राचे महत्त्व लिहा. 5

   ब) कृषि हवामानातील विविध घटकांची पिक उत्पादनाच्या दृष्टिने माहिती लिहा. 5

   क) जमिनीच्या भौतिक गुणधर्माविषयी थोडक्यात माहिती लिहा. 5

   ड) मशागतीमुळे जमिनीवर कोणता परिणाम होतो ते सविस्तर लिहा. 5

   इ) बीज प्रक्रिया म्हणजे काय ? बीज प्रक्रिया करण्याचे उद्देश स्पष्ट करा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

   अ) पिकांना खते देण्याच्या पद्धतीविषयी थोडक्यात माहिती लिहा. 5

   ब) पाणी व्यवस्थापनात आच्छादनाचे महत्त्व विशद करा. 5

   क) तण म्हणजे काय ? तणांमुळे होणारे फायदे आणि तोटे थोडक्यात लिहा. 5

   ड) कोरडवाहू शेतीमध्ये आंतरपीक पद्धतीचे महत्त्व स्पष्ट करा. 5

   इ) पिकांच्या फेरपालटीपासून मिळणारे फायदे लिहा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

   अ) ऊस लागवडीच्या विविध पद्धती कोणत्या ? पट्टा पद्धतीविषयी सविस्तर माहिती लिहा. 5

   ब) कापूस पिकावर येणाऱ्या किडींची नावे लिहा. रस शोषणाऱ्या किडींचे व्यवस्थापन कसे करावे ? 5

   क) भुईमूग पिकात आंतरमशागतीचे महत्त्व लिहा. 5

   ड) सोयाबीन पिकाचे आहारातील महत्त्व सविस्तर लिहा. 5

   इ) तुर पिकातील एकात्मिक किड नियंत्रणाबद्दल माहिती लिहा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) मका पिकावर पुढील मुद्यांवर आधारित माहिती लिहा. 5

i) बियाणे व पेरणी

ii) जमीन व हवामान

iii) पाणी व्यवस्थापन

iv) खत व्यवस्थापन

ब) हरभरा बियाण्याची बीजप्रक्रिया आणि पाणी व्यवस्थापन याबद्दल थोडक्यात लिहा. 5

क) करडई पिकावरील मावा कीड केव्हा पडते ? त्यावर उपाय सुचवा. 5

ड) लसूण पिकाचे महत्त्व लिहा. बियाणे पेरणी आणि उत्पन्नाविषयी माहिती द्या. 5

इ) गजराज गवताची खालील मुद्यांच्या आधारे माहिती लिहा. 5

i) पिकाचे महत्त्व

ii) बियाणे आणि लागवड

iii) खत आणि पाणी व्यवस्थापन

iv) उत्पन्न